# बुद्धिबळाच्या पटाची कहाणी



प्राचीन काळापासून खेळल्या जाणाऱ्या बुद्धिबळ या खेळाचा शोध हिंदुस्थानात लावण्यात आला. शेरम या हिंदुस्थानच्या राजाला यातील बुद्धिकौशल्याचे आणि त्यात असलेल्या अगणित शक्यतांचे फार कौतुक व आश्चर्य वाटत असे.

या खेळाचा शोध त्याच्या राज्यातील एका नागरिकाने लावला होता हे समजल्यावर राजाने त्याला बक्षीस देण्याचे ठरवले.

सेता नावाचा या खेळाचा जनक राजवाड्यात हजर झाला.
तो एक साधा कारकून होता आणि मुलांच्या शिकवण्या करून आपला चरितार्थ चालवत असे.
''सेता, तू इतका सुंदर खेळ शोधून काढला आहेस, त्याबद्दल मी तुला एक मोठे बक्षीस देणार आहे,'' राजा म्हणाला, ''तुझी कोणतीही इच्छा मी पूर्ण करू शकतो. तुला काय हवे ते तू सांग, ते तुला मिळेल.''
सेताने उत्तर दिले : ''बुद्धिबळाच्या पटावरील पहिल्या घरासाठी मला धान्याचा एक दाणा द्या.''

''फक्त एक गव्हाचा दाणा? एवढेच?'' राजाला अश्चर्याचा धक्काच बसला.
''हो महाराज. दुसऱ्या घरासाठी दोन दाणे द्या. तिसऱ्या घरासाठी चार, चौथ्यासाठी आठ, पाचव्यासाठी 16, सहाव्यासाठी 32....''
''बस!'' राजा वैतागून म्हणाला, ''तुझ्या इच्छेप्रमाणे पटावरील सर्व 64 घरांसाठी तुला धान्य मिळेल.''
दरबारातील गणितज्ञ हिशेब करायला बसले आणि मोठ्या मुष्कीलीने त्यांनी किती दाणे द्यावे लागतील त्याचा प्रचंड आकडा शोधून काढला,
तो होता 18,446,744,073,709,551,615.

पहिल्या घरासाठी 1, दुसऱ्यासाठी 2, तिसऱ्यासाठी 4, चौथ्यासाठी 8 वगैरे वगैरे. 63 व्या घरासाठीचा आकडा दुप्पट करून 64 व्या घरासाठी द्यावा लागेल. तो आकडा प्रचंडच होता. एका घनमीटरमध्ये 1,50,00,000 गव्हाचे दाणे मावतात हे आता माहीत आहे. म्हणजे बुद्धिबळाच्या खेळाचा शोध लावणाऱ्या सेताला मिळणारा गहू 12,000,000,000,000 घनमीटर किंवा 12,000 घन किलोमीटर इतका भरेल. धान्याचे कोठार जर 4 मीटर उंच आणि 10 मीटर रुंद असेल, तर त्याची लांबी 300,000,000 किलोमीटर असावी लागेल, म्हणजे पृथ्वीचे सूर्यापासून जे अंतर आहे त्याच्या दुप्पट!
राजादेखील असे बक्षीस देऊ शकला नाही.